



दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**

● वर्ष : ०२ ● अंक : १६४ ● पुणे ● सोमवार, दि. १२ मे २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313






ऑपरेशन सिंदूरचा नांदेड सिटीमध्ये जल्लोष 3



मा. श्री. सचिन दोडके यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव 4

# आमदारांना रोखण्यासाठीच पवारांनी उठवली राष्ट्रवादीच्या एकीकरणाची हूल



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

विधानसभा निवडणुकीत अजित पवार गटाला यश मिळाल्याने शरद पवार गटाचे अनेक आमदार हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संपर्कात आहेत. त्यामुळे दोन्ही पवार गट एकत्र येतील, असे संकेत देऊन या आमदारांना रोखण्याची खेळी शरद पवार यांनी रचली आहे.

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला घवघवीत यश मिळाले होते. त्यामुळे काही नेते हे शरद पवार यांच्या सोबत राहिले होते. पण विधानसभा निवडणुकीत केवळ दहा आमदारांवर शरद पवार गट सीमित राहिला. आणि अजित पवार गट सत्तेवर आला. त्यामुळे विरोधी पक्षात राहून काही साध्य होणार नाही, असे शरद पवार गटाचे आमदार उघडपणे बोलू लागले आहेत. तसेच त्यांनी शरद पवार यांना भेटून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. या आमदारांनी सत्तेसोबत जाण्याचा तगादा लावला आहे त्यामुळे शरद पवार अस्वस्थ आहेत.

त्यातच शरद पवार गटात जुने आणि नवे नेते असे गट पडले आहेत. त्यांच्यातील वाद टोकाला गेला आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे भाजपच्या वाटेवर असल्याची जोरदार चर्चा होती. त्यांच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी गुप्त भेटीगाठी झाल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. पवार गटातील रोहीत पवार यांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे जुने नेते अस्वस्थ आहेत. तर जुने नेत्यांचे भाजप आणि अजित पवार यांच्याशी साटेलोटे आहे, असा रोहित पवार यांच्यासह नव्या नेत्यांचा आक्षेप आहे. त्यामुळे या नव्या जुन्याच्या भांडणात शरद पवार यांची कोंडी झाली आहे.

त्यामुळे शरद पवार गटाच्या नेत्यांनी अजित पवार यांच्या विरोधात वक्तव्ये करणे सध्या बंद केले आहे. शरद पवार गटाचे निम्म्याहून अधिक आमदार हे निधीसाठी अजित पवार यांना भेटत आहेत. त्यांनी आम्ही तुमच्या पक्षात येण्यास तयार आहोत, हे अजित पवार यांना सांगून टाकले आहे. केवळ आमदारच नाही काही खासदार ही अजित पवार आणि सुनील तटकरे यांच्या संपर्कात आहेत. त्यामुळे या बदललेल्या राजकीय परिस्थितीत शरद पवार यांनी ही खेळी केली आहे. दोन पवार एकत्र येणार असतील तर आपण शांत बसलेले बरे, असा विचार अजित पवार यांच्याकडे झुकलेले आमदार आणि खासदार करतील, असे या संकेतामागचे कारण आहे. दुसरे पुढील चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका राज्यात होत आहेत. या निवडणुकांच्या तोंडावर पक्षात फूट पडली तर अवघड स्थिती बनेल, यातून पवार यांनी हे विधान केले आहे.

## दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का?



**राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येण्याबाबतचा निर्णय आता खासदार सुप्रिया सुळे व उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांनीच घ्यावा, असे धक्कादायक विधान शरद पवार यांनी गुरुवारी माध्यमांशी बोलताना केले. त्यामुळे राजकीय भूकंपाच्या शक्यतेवर जोरदार चर्चा सुरु झाली आहे. पुण्यातील माध्यमांच्या प्रतिनिधींनी गुरुवारी सकाळी शरद पवार यांची भेट घेतली. त्यावेळी अनौपचारिक संवाद साधताना त्यांनी हे विधान केले. एका इंग्रजी वर्तमानपत्राला नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत पवार यांनी विविध विषयांवर भाष्य केले होते. आपल्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात दोन मतप्रवाह असल्याचंही त्यांनी सांगितले होते. एका गटाला वाटतं आम्ही एकत्र यावं, तर दुसऱ्या गटाला वाटतं की, स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवावे. त्याबाबत छेडले असता पवार म्हणाले की, एकत्र यायचे की नाही, पुढे कसे जायचे, हे आता खासदार सुप्रिया सुळे आणि अजित पवार यांनीच ठरवावे. दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा हा प्रश्न नाही, विचारसरणी कधी ना कधी एकच होती, त्याचा हा प्रश्न आहे. मी आता सक्रिय राजकारणात राहणार नसल्यामुळे जो काही निर्णय आहे तो सुप्रिया आणि अजितनेच घ्यावा. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस 1999 ला सुद्धा वेगवेगळे लढले होते. मात्र निवडणुकीनंतर आम्ही विलासरावांना मुख्यमंत्री केले. माझ्या हाती निर्णय घेण्याचे अधिकार असल्यामुळे युवकांना संधी देण्याला मी कायम प्राधान्य दिले, अशी पुष्टीही त्यांनी जोडली. संसदेमध्ये सत्ताधारी पक्षासोबत बसायचं की, विरोधी पक्षासोबत बसायचं यांचा निर्णयही आता सुप्रिया सुळेंनीच घ्यावा, असं वक्तव्यही पवारांनी केलं होते.**






## ठळक बातम्या

### कोंढव्यात तरुणाचा डोक्यात दगड घालून खून

**पुणे (आरंभ पर्व) : कोंढव्यातील ज्योती हॉटेलजवळ एका तरुणाचा डोक्यात दगड घालून रविवारी (ता. ११) निर्घृण खून करण्यात आला आहे. यासंदर्भात कोंढवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खुनाचे कारण समोर आले नसून सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या आधारे पोलिसांनी तपास सूरू केला आहे. रघुनाथ रघुवीर परदेशी ( वय ३०, रा. बोपोडी) हे मृताचे नाव आहे. कोंढव्यातील ज्योती हॉटेलजवळील मोकळ्या मैदानात एक मृतदेह आढळल्याची माहिती रविवारी दुपारी पोलिसांना समजली. त्यानुसार पोलिसांनी त्वरित घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी हा तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. त्याला पोलिसांनी ससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. त्याच्याकडील सापडलेल्या वस्तुंवरून हा मृतदेहाची ओळख पटली. हा तरुण बोपोडीत राहणारा असून तो कोंढव्यात कशाला आला व कोणाला भेटला याबाबत तपास पोलिसांनी सूरू केला आहे.**











# जित्याची खोड...



आम्ही शांततेत राहावे म्हणून युद्ध करतो असे प्रख्यात ग्रीक तत्वज्ञ ॲरिस्टॉटल याचे वचन आहे. त्याची प्रचिती मोदी यांनी काही दिवसांपासून सुरू असलेल्या पाकिस्तानविरुद्धच्या युद्धात आणून दिली. मोदी यांचा युद्धाचा आडाखा अचूक होता. भारताने पाकच्या नागरिकांवर हल्ले केले नाहीत. पाकच्या मांडीवर बसून भारतातील निरपराध नागरिकांना कंठस्नान घालणाऱ्या दहशतवाद्यांना टार्गेट केले. हे युद्ध होते आणि पाकचा या युद्धात सर्वंकष पराभव झाला, तसा तो पूर्वीही साडेतीन वेळा झाला आहे. पण आता तर तो जास्तच परिणामकारक आणि प्रिसिजन म्हणजे अचूक हल्ला होता असे म्हणावे लागेल. मोदी यांचे अचूक अंदाज आणि आडाखे किती अचूक आहेत याचा अंदाज येतो. वास्तविक हे युद्ध पारंपरिक अर्थाने नव्हते, तर हा पाकच्या नापाक इराद्यांना जमीनदोस्त करण्याच्या इराद्याने भारताने पाकला शिकवलेला धडा होता. पहलगाम येथे पाकच्या दहशतवाद्यांनी पर्यटकांवर नृशंस हल्ले केले आणि त्यांचे कपडे काढून त्यांना ठार मारले. अनेकांना कलमा पढायला लावला आणि ज्यांना तो येत नव्हता त्यांना पॉइंट ब्लॅंक गोळ्या घातल्या. या दहशतवाद्यांना मोदी यांनी धडा शिकवण्याचा निर्धार केला आणि तो अमलातही आणला. या जागी नेहरू किंवा कॉंग्रेसचे सरकार असते तर मुळमुळीत निषेधाचे खलिते धाडत बसले असते. पण मोदी आणि नेहरू किंवा कॉंग्रेस यांच्यात हा गुणात्मक फरक आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपाचे सरकार आपल्याला नेमके काय हवे आहे हे निश्चित जाणते आणि तसेच करते. त्यामुळे मोदींची लोकप्रियता पराकोटीची वाढली आहे. पण येथे मोदी यांच्या लोकप्रियतेचा प्रश्नच नव्हता. ज्या भारताच्या निरपराध भगिनींनी आपले कुंकू गमावले त्यांच्या पतींच्या हत्येचा बदला घेणे आवश्यक होते आणि तेच मोदी यांनी केले. त्यामुळे या कारवाईला मोदी यांनीच 'ऑपरेशन सिंदूर' हे सार्थ नाव दिले.

भारताला आता विरोधक शहाणपणा शिकवत आहेत की, भारताने युद्ध का केले नाही आणि पाकला संपूर्ण उद्ध्वस्त करायला हवे होते. जर तसे केले तर हेच विरोधक बोंबलत गेले असते की मोदी सरकारने पाकच्या लोकांना ठार मारले म्हणून. त्यामुळे मोदी यांनी शांत राहून आपला बदला घेतला आणि महिलांना न्यायही दिला आहे. पाकच्या कोणत्याही भुलावणीस बळी पडू नये हे जाणून मोदी यांनी पाकला आता त्यांच्या दहशतवाद्यांच्या अड्यांना उद्ध्वस्त केले आहे. जर लोकांना मारले असते तर पाक गाऱ्हाणी घेऊन बोंबलत गेला असता. पण आता त्याला ती संधी नाही. कारण भारतीय लष्कराने दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर हल्ले करून ते बेचिराख केले आहेत. यातच मसूद अझर याच्या कुटुंबीयांचा खात्मा झाला आहे. हा मसूद अझर म्हणजे तोच की ज्याने कंदाहार येथे विमान अपहरण प्रकरणात भारतीयांना ओलिस ठेवले होते आणि त्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहिला होता. त्याचे नऊ कुटुंबीय ठार झालेत, तर दुसरा एक दहशतवादी अब्दुल रऊफ हा देखील या 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये ठार झाला आहे. हे युद्ध नव्हते तर पाकला त्याच्या जबरदस्त आगळीकीबद्दल तितकीच न भूतो न भविष्यती अशी शिक्षा होती. दहशतवादी आता हा धडा धेऊन चुकले असतील. आता भारतात कॉंग्रेसचे सरकार नाही, तर मोदी यांच्या भाजपाचे राज्य आहे आणि ते आपल्याला थोड्याही चुकीचे प्रायश्चित्त देते. पाकच्या शस्त्रसंधीवर भारताचा विश्वास नाही. त्यामुळे आता भारताने पाकला ठणकावून सांगितले आहे की यापुढे जर पाकने कोणतीही आगळीक केली, तर ते भारताविरोधात युद्ध पुकारले असा त्याचा अर्थ घेतला जाईल. यामुळे पाक आधीच गर्भगळीत झाला आहे. मोदी यांनी सिंधू जल करार स्थगित राहील अशी व्यवस्था केली आहे. त्यामुळे पाकच्या नाकातोंडात पाणी गेले आहे आणि त्यामुळे त्यांची शेती पाण्याअभावी सुकणार आहे. तसेच कित्येक आर्थिक उपाय योजले आहेत ज्यामुळे पाकचे जिणे मुश्किल होणार आहे. पाकला शिकवला तो धडा पुरेसा नसला तरीही सध्या तरी इतके पाकला आपल्या चुकीची जाणीव करून देणे आवश्यक होते आणि ती मोदी यांनी करून दिली आहे. भारताने या ऑपरेशनमध्ये दहशतवादी तळांवर हल्ले करून ते उद्ध्वस्त केले. हे यश फार मोठे आहे. भारताने कुठेही जनतेला ढाल केले नाही. त्याउलट पाकने त्याच्या स्वभावानुसार आपल्याच जनतेला ढाल करून भारतीय लष्करांवर हल्ले केले होते. पण ते हल्ले सर्व फोल ठरले. आता पाकला असा धडा शिकवला आहे की काही वर्षे तरी तो यातून डोके वर काढू शकणार नाही. पाकच्या कारवाया बंद तर होतीलच पण दहशतवादी ज्यांनी पहलगाम हत्याकांड घडवले त्यांना वेचून ठार मारण्यावर आता भारत लक्ष केंद्रित करेल. कारण भारताची ही जखम आहे की, जे दहशतवादी या हल्ल्याला जबाबदार आहेत ते तर पळून गेले आहेत. त्यांना जोपर्यंत शिक्षा होत नाही तोपर्यंत भारताचा बदला अपुरा राहील. आता पाकला शांततेची शिकवण याद येते आहे. पाकचे दैनीक 'द डॉन'मध्ये उपदेशाचे डोस पाजले आहेत की युद्ध कसे चुकीचे आहे. पण अगोदर कुणी सुरुवात केली आणि इतके दिवस पाक तेच करत होता. आता भारताकडून जशास-तसे किंबहुना त्यापेक्षाही कडवे उत्तर मिळायला लागले म्हणून पाकला आता शांतता आठवते आहे. शांतता हवी असेल तर ताकदवान असावे लागते. दुर्बळांच्या आवाहनाला कुणीही प्रतिसाद देत नाही. भारताने हे सिद्ध केले आहे. पाकने मात्र आपण अद्यापही सुधारत नाही असे वारंवार सिद्ध केले आहे. त्याने शस्त्रसंधी झाल्यावरही आगळीक सुरूच ठेवली आहे. पाकचे ड्रोन भारतीय हद्दीत येत आहे आणि त्यामुळे कित्येक घरांचे नुकसान झाले आहे. तसेच काही ठिकाणी माणसेही ठार झाली आहेत. पाकला कोणत्याही परिस्थितीत सामंजस्याचे बोलणे समजत नाही. त्याला बरबादीची भाषाच समजते. तसे असेल तर भारतही त्यास आता तसेच उत्तर देईल. मोदी यांनी पाकला धडा तर शिकवला आहे पण पाक ते समजणार नसेल तर पाकशी सर्वंकष हल्ल्याची भाषा करावी लागेल. अजूनही पाकच्या कुरापती काढण्याचे उद्योग सुरूच आहेत. त्या थांबल्या नाहीत, तर भारताला अखेरचा घाव घालावा लागेल. मग पाकला जगातील कोणताही देश वाचवू शकणार नाही हे सत्य आहे.

# ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशनतर्फे अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

- **केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री श्री. मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते एरो मॉलमधील या प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले असून भारतातील वेगाने वाढणाऱ्या विमानवाहतूक क्षेत्रासाठी तरुणांना कौशल्ययुक्त बनविणे हे या प्रशिक्षण केंद्राचे उद्दिष्ट आहे.**




**ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशन ब्रँडअंतर्गत चेन्नईमध्ये 2024 मध्ये सुरु झालेल्या प्रशिक्षण केंद्रानंतर पुणे हे त्यांचे दुसरे प्रशिक्षण केंद्र आहे. लवकरच कोची, अहमदाबाद आणि विशाखापट्टणम येथेही केंद्रे सुरु होणार आहेत. ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशन ही ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेसची एक शाखा असून, ही संस्था अपडेटर सर्व्हिसेस लि. या समूहाचा भाग आहे. अपडेटर सर्व्हिसेस लि. ही भारतातील सर्वात मोठी एकात्मिक सुविधा व्यवस्थापन व व्यवसाय सहाय्य सेवा पुरवणारी कंपनी असून या कंपनीत 65,000 हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत. "हे केवळ प्रशिक्षण केंद्र नाही, तर हजारो भारतीय तरुणांसाठी विमानतळ क्षेत्रातील करिअरकडे जाणारा मार्ग आहे," असे व्यवस्थापकीय संचालकांनी नमूद केले. "कोणत्याही तरुणाला — मग तो ग्राउंडवर काम करण्याची इच्छा बाळगत असो किंवा एअरक्रू व्हायचे स्वप्न पाहत असो — त्याला दर्जेदार शिक्षण, आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र आणि प्रत्यक्ष अनुभव मिळावा, यासाठी आमची कटिबद्धता आहे."**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पश्चिम भारतात विमानवाहतूक क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्यविकासाच्या देण्यासाठी ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेसची प्रशिक्षण शाखा असलेल्या ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशनतर्फे (पुणे विमानतळावरील विमानतळ ग्राउंड हँडलिंग सेवांसाठी भारतीय विमानतळ प्राधिकरणाची परवाना प्राप्त संस्था) पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळालगत असलेल्या एरो मॉलमधील त्यांच्या प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन केले. या अत्याधुनिक केंद्राचे उद्घाटन भारत सरकारचे नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री श्री. मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते करण्यात आले.

हे नवीन प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून पुणे शहराचे भारतातील विमानवाहतूक क्षेत्रातील वाढते महत्त्व अधोरेखित होते. आतापर्यंत विमानतळ सेवा संचालनाचा महत्त्वाचा बेस असलेले हे शहर विमानचालन प्रशिक्षण आणि रोजगार संधी उपलब्ध करून देणार आहे.

"गुणवत्ता व अभिनवतेचे शहर ही कायमच पुण्याची ओळख राहिलेली आहे. उडान योजनेअंतर्गत हवाई जोडणीचा विस्तार आणि प्रवासी वाहतुकीतील वाढ यामुळे या भागातील युवा वर्गाला योग्य वेळी कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध होणार आहे", असे नागरी विमान वाहतूक व सकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले. "पुण्यात गुंतवणूक केल्याबद्दल आणि भारताला जागतिक विमानचालन केंद्र म्हणून घडविण्याच्या भारत सरकारच्या व्हिजनला पाठबळ दिल्याबद्दल मी ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशनची प्रशंसा करतो."

ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशनच्या पुण्यातील केंद्रातर्फे विमानतळ ग्राउंड हँडलिंग, केबिन क्रू प्रशिक्षण, विमानतळ संचालन व व्यवस्थापन या विषयाचे पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि पदवी अभ्यासक्रम एएमईटी विद्यापीठाच्या सहयोगाने उपलब्ध करून देण्यात येतील. शासन नियंत्रक संस्थांच्या आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना येथे आणण्याची तयारी सुरू असून, प्रत्यक्ष प्रशिक्षणाचा अनुभव देण्यासाठी पूर्ण सुसज्ज मॉक एअरक्राफ्ट कॅबिन विकसित करण्यात येत आहे.

"पुण्यात हे केंद्र सुरू करताना आम्हाला अभिमान वाटत आहे. यामुळे आम्हाला आमची इनहाउस मागणी पूर्ण करता येईल आणि विमातळावरील कामकाज क्षेत्राची करिअर म्हणून निवड करू इच्छिणाऱ्या संभाव्य एव्हिएटर्सना (विमानतळ क्षेत्रात कार्यरत तांत्रिक व व्यावसायिक कर्मचारी) सुयोग्य प्लॅटफॉर्म उपलब्ध होईल.", असे ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेसच्या व्यवस्थापकीय संचालक सरिता कुमारी म्हणाल्या.

पुणे विमानतळावर 400 कर्मचारी कार्यरत असून त्यापैकी 95% कर्मचारी पुणे व आसपासच्या जिल्ह्यांतील आहेत. हे केंद्र म्हणजे, स्थानिक रोजगार, कौशल्य व विमानचालन उत्कृष्टता साध्य करण्याच्या आमच्या प्रतिबद्धतेचे विस्तारीकरण आहे.

पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या समोर असलेल्या भारतातील पहिल्या एअरपोर्ट मॉल संकुलात हे प्रशिक्षण केंद्र असून येथे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विमानतळ संचालनाच्या प्रक्रियेचा थेट आणि प्रत्यक्ष अनुभव घेता येतो.

प्रशिक्षणार्थींना ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेसच्या तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. ही संस्था देशातील 23 विमानतळांवर कार्यरत असून, त्यामध्ये केवळ महाराष्ट्रातच पुणे, औरंगाबाद, जळगाव आणि सिंधुदुर्ग यांचा समावेश आहे. एक विमानतळ ग्राउंड हँडलिंग कंपनी म्हणून, महाराष्ट्रासह देशातील इतर भागांमध्ये आमची उपस्थिती वाढवण्याची आमची बांधिलकी कायम आहे. देशभरात विमानवाहतूक क्षेत्रातील पायाभूत सुविधा आणि प्रशिक्षणाची गुणवत्ता उंचावण्याच्या आमच्या ध्येयासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.

या प्रशिक्षण केंद्रात स्मार्ट वर्गखोल्या, मल्टिमीडिया सुविधांनी सुसज्ज प्रशिक्षण हॉल, सध्या विकसित होत असलेली कॅबिन क्रू प्रशिक्षण प्रयोगशाळा, करिअर मार्गदर्शन व प्लेसमेंटसाठी सहाय्य आणि पुणे विमानतळावर थेट प्रत्यक्ष अनुभव घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

देशातील वेगाने विकसित होणाऱ्या विमानतळांपैकी एक असलेल्या पुणे विमानतळावर आर्थिक वर्ष 2024–25 मध्ये 10.54 मिलियनहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला असून, सध्या येथे मोठ्या प्रमाणावर विस्तारकाम सुरू आहे. देशांतर्गत तसेच प्रादेशिक उड्डाणांची वाढती मागणी लक्षात घेता, शहरात विविध पदांकरिता प्रशिक्षित विमानतळ कर्मचाऱ्यांची गरज झपाट्याने वाढत आहे.

# नोकरांकडून पुण्यात ज्येष्ठाची ३५ लाखांची फसवणूक

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सुश्रूषेसाठी ठेवलेल्या नोकरांनी ज्येष्ठ नागरिकाची बनावट सही करून बँक खात्यातून ३५ लाख ५१ हजारांची रक्कम काढून घेतल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आकाश ज्ञानेश लिमकर (रा. वारजे माळवाडी) आणि आदित्य संजय मोरे (रा. पाषाण) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत एका ज्येष्ठ महिलेने चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिलेचे पती आजारी आहेत. त्यांची देखभाल, तसेच सुश्रूषेसाठी आरोपी लिमकर आणि मोरे यांना नेमण्यात आले होते. सप्टेंबर २०२३ पासून दोघे जण त्यांच्याकडे कामाला होते. दोघांनी त्यांच्या आजारपणाचा फायदा घेतला. ज्येष्ठ महिलेच्या पतीचे नाव असलेली धनादेश पुस्तिका, तसेच डेबिट कार्ड चोरले. धनादेशावर बनावट सही करून त्यांच्या खात्यातून वेळोवेळी ३५ लाख ५१ हजार रुपये काढून घेतले. फसवणुकीचा प्रकार नुकताच उघडकीस आला.

# सामाजिक विचारमंथनासाठी साहित्याचा आधार, डॉ. सदानंद मोरे यांचे मत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'भाषेच्या माध्यमातून माणूस विचार, कल्पना, अनुभवातून साहित्य निर्मिती करू शकतो. अनुभवाला कल्पनेची जोड दिल्यास उत्तम कथा निर्माण होते. आपल्या जगण्याशी, अनुभवांशी साधर्म्य सांगणाऱ्या कथा वाचकाला भावतात. आधुनिक तंत्रज्ञानामुळे कुटुंबव्यवस्थेवर परिणाम होत असताना सामाजिक विचारमंथन होण्यासाठी साहित्याचा आधारच उपयुक्त ठरतो,' असे मत राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी रविवारी व्यक्त केले.



करम प्रतिष्ठानाच्या दहावा वर्धापनदिन कार्यक्रमात डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते स्मिता जोशी-जोहरे यांच्या 'तरंग' या कथासंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. त्या प्रसंगी मोरे बोलत होते. करम प्रतिष्ठानाचे अध्यक्ष भूषण कटककर, प्रज्ञा महाजन, डॉ. बाबूल पठाण, प्रमोद आडकर, ज्योत्स्ना चांदगुडे, धनंजय तडवळकर, स्वाती सामक या वेळी उपस्थित होत्या.

मोरे म्हणाले, 'कथा हा साहित्य प्रकार माणसाला जगायला, सक्षम व्हायला उपयुक्त ठरतो. तरंग संग्रहातील कथांतून विवाह संस्था, स्त्रीची रूपे, वृद्धत्वाचे प्रश्न, कुटुंब व्यवस्था यावर भाष्य होत प्रस्थापित संकल्पना बदलण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. झपाट्याने विकसित होणाऱ्या तंत्रज्ञान आणि विज्ञानामुळे मानवाला सतत बदलांना सामोरे जावे लागत आहे, त्यामुळे आज कुटुंब व्यवस्था धोक्यात आली आहे.

अशा वेळी साहित्यकृतींचा सामाजिक मंथन होण्यासाठी नक्कीच उपयोग होतो.' उत्तरार्धात झालेल्या गज़ल संमेलनात निरुपमा महाजन, प्राजक्ता वेदपाठक, मुक्ता भुजबले, वैजयंती आपटे, वासंती वैद्य यांनी सहभाग घेतला.

# मलाबार गोल्ड अँड डायमंड्स 'तन्विका' चे केले अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विश्वासार्ह सराफ पेढी असलेल्या मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने 'तन्विका' हा मंदिरातील दागिन्यांचा एक नवीन संग्रह प्रस्तुत केला आहे. हा दागिन्यांचा संग्रह देवी लक्ष्मीपासून प्रेरित आहे. यात भक्तीच्या भावनेचे उत्सव साजरे करणाऱ्या आभूषण रचना समाविष्ट आहेत. देवत्वाने प्रेरित आणि निपुण कारागिरीतून जिवंत केले गेलेले तन्विका दागिने हे कालातीत परंपरा आणि सौंदर्यातील विलक्षणतेला प्रतिबिंबित करणाऱ्या भव्य निर्मितीचे प्रतीक आहेत.




तन्विका संग्रहाचे पुण्यातील लक्ष्मी रोडवरील सारसन प्लाझा येथील ब्रँडच्या शोरूममध्ये आयोजित एका विशेष कार्यक्रमात अधिकृतपणे अनावरण करण्यात आले, ज्यायोगे परंपरा आणि साजेशा रचनांचा भव्य उत्सव साजरा करण्यात आला.

या अनावरण सोहळ्याला मराठी चित्रपटसृष्टीतील आघाडीच्या कलाकार सुश्री स्मिता शेवाळे, सुश्री नेहा नाईक, श्री समीर धर्माधिकारी, श्री अवधूत गांधी आणि श्री तेजस बर्वे उपस्थित होते, ज्यांनी अलीकडेच 'श्री संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या प्रशंसित मराठी चित्रपटात अभिनय केला आहे.

मंदिरातील दागिन्यांच्या समृद्ध वारशाचे प्रतीक असलेले तन्विका दागिने पवित्र कलात्मकतेतून प्रेरणा घेतात. संग्रहातील बारकाईने तयार केलेला प्रत्येक नग केवळ सौंदर्याचे प्रतीक नाही तर एक मौल्यवान वारसा देखील आहे. हे अनावरण मलाबार गोल्ड अँड डायमंड्ससाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे, कारण भारताच्या सांस्कृतिक वारशाशी जुळणारे आणि परंपरेला समृद्धीशी जोडणारे दागिने त्याने प्रस्तुत केले आहेत. नवीन संग्रहाच्या प्रस्तुतीबद्दल भाष्य करताना, मलाबार समूहाचे अध्यक्ष एमपी अहमद म्हणाले, "मंदिरातील दागिन्यांचा नवीनतम संग्रह 'तन्विका' सादर करणे हे आमच्यासाठी खास उत्सुकतेचे होते. हे दागिने वारसा आणि उत्कृष्ट कारागिरीचे मिश्रण आहेत. हा उत्कृष्ट संग्रह परिधान करणाऱ्यांना शोभा आणि भव्यता आपोआपच प्राप्त होईल. हार, बांगड्या आणि कानातले यासारख्या सूक्ष्म गुंतागुंतीच्या रचना असलेला हा संग्रह परंपरा आणि आधुनिक संवेदनशीलतेचा उत्सवच आहे. संग्रहाचा अनुभव घेण्यासाठी आणि आमच्या किंमत संरक्षण योजनेचे आणि इतर विशेष योजनांचे फायदे घेण्यासाठी मी सर्वांना पुण्यातील लक्ष्मी रोडवरील आमच्या शोरूमला भेट देण्याची विनंती करतो आणि सर्वांच्या स्वागतासाठी सज्जता करतो."

# थोडक्यात



## रमेश करमरकर यांच्या वैविध्यपूर्ण छायाचित्रांचे १४ पासून प्रदर्शन

**पुणे (आरंभ पर्व) : ज्येष्ठ हौशी, मनस्वी छायाचित्रकार रमेश करमरकर यांच्या वैविध्यपूर्ण आणि पारितोषिक प्राप्त छायाचित्रांचे प्रदर्शन पुणेकरांना पाहण्याची पर्वणी आहे. येत्या १४ ते २१ मे २०२५ या कालावधीत कोथरूड येथील हॅप्पी कॉलनीमध्ये असलेल्या पु. ना. गाडगीळ अँड सन्स कला दालनात हे प्रदर्शन सकाळी ११ ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन बुधवारी (ता. १४) सकाळी ११.३० वाजता अभिनेत्री व निर्माती, कलाकार भाग्यश्री देसाई यांच्या हस्ते होणार आहे. गेल्या ५५ वर्षांपासून रमेश करमरकर यांनी फोटोग्राफीचा छंद जोपासला आहे. बेलोज कॅमेऱ्यापासून ते मिररलेस कॅमेऱ्याच्या वापरातून त्यांनी विविध देशांतील जीवनशैली, तेथील निसर्गसौंदर्य, सांस्कृतिक वैभव आपल्या कॅमेऱ्यात टिपले आहे. महाराष्ट्र सरकारच्या प्रथम पारितोषिकासह भारत सरकार व इतर अनेक नामांकित संस्थांची पारितोषिके त्यांच्या अनेक छायाचित्रांना मिळालेली आहेत. ही सर्व पारितोषिक प्राप्त छायाचित्रे, बैलगाड्यांची शर्यत, आयफेल टॉवरचा अद्वितीय अँगल, नायगारा धबधबा, ट्युलिप फ्लॉवर्सची मनमोहक छायाचित्रे प्रदर्शनात पाहता येणार आहेत.**




## विद्यार्थी आणि उपस्थितांना दिली दमा निर्मूलनाची शपथ

**पुणे (आरंभ पर्व) : सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस -कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आणि श्वसन फिजिओथेरपी विभागाने "सर्वांसाठी इनहेल्ड ट्रीटमेंट्स उपलब्ध करा" या जागतिक दमा दिनानिमित्त च्या कल्पनेनुसार अर्थपूर्ण जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमानुसार फिजिओथेरपीच्या विद्यार्थ्यांसाठी पोस्टर बनवण्याची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यांच्या सर्जनशील आणि माहितीपूर्ण पोस्टर्सद्वारे, विद्यार्थ्यांनी दम्याबद्दलची चिन्हे, लक्षणे, ट्रिगर्स आणि दम्याच्या अटॅक दरम्यान घ्यावयाची आवश्यक काळजी याबद्दल मौल्यवान संदेश प्रदर्शित केले. या प्रदर्शनांचा उद्देश समुदायामध्ये जागरूकता वाढवणे आणि दम्याच्या काळजीबद्दल चांगली समज निर्माण करणे हा होता. या प्रदर्शनाचे उद्घाटन प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया संस्थापक व अध्यक्ष सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन , सुषमा चोरडिया उपाध्यक्ष सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन व अध्यक्ष स्वेला यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. प्रा. डॉ. चोरडिया यांनी विद्यार्थ्यांना असे उपक्रम राबवत राहण्यास प्रोत्साहित केले आणि निरोगी समाज निर्माण करण्यासाठी आरोग्यसेवेच्या जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी "येत्या दशकात दमा निर्मूलनासाठी आपण प्रयत्न करू या - प्रत्येक प्रयत्न महत्त्वाचा आहे." असा प्रेरणादायी संदेश विद्यार्थ्यांना दिला. प्राचार्य डॉ. सीमा रेठरेकर आणि कार्डिओपल्मोनरी फिजिओथेरपिस्ट यांनी मेळाव्याला संबोधित केले आणि दमा व्यवस्थापन आणि श्वसन काळजीमध्ये फिजिओथेरपिस्टच्या महत्त्वाच्या भूमिकेबद्दल माहिती दिली . त्यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागाबद्दल आणि कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल विभागाचे कौतुक केले. प्राध्यापक डॉ. राजकिरण टिकू, डॉ. अंजली बैस आणि डॉ. मानसी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना प्रदर्शनाकरिता मार्गदर्शन केले आणि कार्यक्रम अधिक माहितीपूर्ण आणि सुव्यवस्थित असावा याची खात्री केली. प्रा डॉ संजय बी चोरडिया आणि सुषमा चोरडिया यांनी विद्यार्थी आणि उपस्थितांना दमा निर्मूलनाची शपथ' दिली तसेच जागरूकता पसरवण्याची आणि दम्याच्या प्रतिबंध, नियंत्रण आणि व्यवस्थापनात योगदान देण्याची प्रतिज्ञा केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सामुदायिक आरोग्य जागरूकतेमध्ये सक्रियपणे सहभागी होण्यास प्रोत्साहन मिळाले.**

# ऑपरेशन सिंदूरचा नांदेड सिटीमध्ये जल्लोष



## सैन्य दल व खंबीर सरकार यामुळेच ऑपरेशन सिंदूर यशस्वी : पोकळे

यावेळी बोलताना खडकवासला विधानसभा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे पाटील यांनी भारताचे सैन्य दल व खंबीर सरकार यामुळेच हे ऑपरेशन यशस्वी झाले असे मत मांडले. पहलगाम मधील भ्याड दहशतवादी हल्ल्याला उत्तर नव्हे तर एक मोठा सर्जिकल स्ट्राइक पाकिस्तानवर ह्या निम्मित झाला आहे. दहशतवाद खपवून घेतला जाणार नाही ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भूमिका संपूर्ण जगाला यानिमित्त कळाली आहे.

- बापूसाहेब पोकळे पाटील, सरचिटणीस खडकवासला भाजपा

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

पाकिस्तान मुर्दाबाद, पाकिस्तान हाय हाय, नीम का पत्ता कडवा हे पाकिस्तान भडवा. हे. पाकिस्तान विरोधी घोषणा देत पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यात निष्पाप भारतीय नागरिकांचा बळी गेला. ज्यांचे कुंकू पुसले गेले त्या माता - भगिनींच्या अश्रूंना उत्तर देण्यासाठी भारतीय सेने मधील लेकिनी पाकिस्तानात घुसून 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. त्याबद्दल खडकवासला विधानसभा आ.भिमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी - खडकवासला विधानसभा मतदार संघाच्या वतीने नांदेड सिटी येथे ही सिंदुर विजयोत्सव साजरा करण्यात आला.

देशाचे यशस्वी नेतृत्व करणारे पंतप्रधान मा. नरेंद्रजी यांनी पहलगाम दुर्घटनेतील दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर ह्या निमित्त दिल्याची प्रचिती दिसून आली. याप्रसंगी भारतीय सैन्य दल व सरकार यांचे कौतुक करून आभार व्यक्त करण्यात आले. भारत माता की जय,वंदे मातरम,या घोषणा देण्यात आल्या.

यावेळी भारतीय जनता पार्टी खडकवासला विधानसभा मतदार संघांचे सरचिटणीस बापूसाहेब पोकळे, मंडल अध्यक्ष रुपेश घुले पाटील, खडकवासला भाजपा महिला आघाडी अध्यक्ष रश्मी घुले पाटील, हेमेंद्र जोशी,तेजस्विनी राज शिरोडकर, सुप्रिया करमरकर यांच्यासह, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात



### डोणजे ग्रामपंचायततर्फे दिव्यांगांना मदतीचा हात

खडकवासला (आरंभ पर्व) : सिंहगड परिसरातील दिव्यांग बांधवांना डोणजे ग्रामपंचायत च्या वतीने एकूण अडीच लाख रुपये यांची मदत देण्यात आली. नुकतेच ग्रामपंचायत कार्यालयामध्ये आर्थिक वर्ष 2024 /2025 चा दिव्यांग निधी धनादेशाद्वारे वितरित करण्यात आला. यावेळी पुणे जिल्हा दिव्यांग विकास आघाडीचे अध्यक्ष बाजीराव पारगे, सरपंच सारिका बाबत यांच्या हस्ते दिव्यांग बांधवांना प्रत्येकी 21 हजार रुपयांचे धनादेश व साहित्य वाटप करण्यात आले. तसेच दिव्यांग जेष्ठ नागरिकांनाही मदत करण्यात आल्याचे श्री बाजीराव पारगे यांनी सांगितले. यावेळी पुणे जिल्हा दिव्यांग विकास आघाडीचे अध्यक्ष बाजीराव पारगे, ग्रामविकास अधिकारी सतीश चव्हाण, सरपंच सारिका भगत, उपसरपंच तेजस कोडीतकर, मा. उपसरपंच शेखर पारगे, सायली चव्हाण, पुनीत चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.

### सचिन विष्णू कांबळे यांचे निधन



पुणे (आरंभ पर्व) : कसबा पेठ येथील सम्राट अशोकनगरमधील रहिवाशी, पुणे महानगरपालिकेचे कर्मचारी कालकथित सचिन विष्णु कांबळे (वय ४०) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे पती, दोन मुले, आई, भाऊ-बहिणी असा परिवार आहे. महापालिकेतील नोकरीसोबतच कांबळे यांचा सामाजिक उपक्रमांतही सक्रिय सहभाग होता. राष्ट्रवादी युवक काँग्रेस खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संघर्ष समिती पुणे जिल्हा अध्यक्ष संघदिप शेलार यांचे ते मामेभाऊ होते.



### वाचन संस्कृती वाढावी म्हणून प्रियंका चौधरींकडून ५००० पुस्तकांचे वाटप

पुणे (आरंभ पर्व) : वाचनसंस्कृतीला चालना देण्यासाठी आणि ज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने, "लायब्ररी गर्ल" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रियंका चौधरी यांनी ५००० पुस्तकांचे मोफत वाटप पुणे शहर आणि उपनगरात केले. या उपक्रमाअंतर्गत विविध प्रकारची पुस्तके – कथा, विज्ञान, आत्मविकास, शालेय अभ्यासक्रम, आणि बालसाहित्य वाचकांच्या हातात मोफत पोहोचवण्यात आली. निमित्त होत त्यांच्या जन्म दिनाचे जन्मदिनाचा वायफट खर्च न करता समाजहिताचा प्रियंका यांनी हा उपक्रम राबवला. यामध्ये प्रामुख्याने स्थानिक सामाजिक संस्था, शाळा आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात आले, जेणेकरून ज्ञानाची समान संधी सर्वांना मिळावी. हाच मूळ उद्देश होता. नागरिक, विद्यार्थी, शिक्षक आणि वाचनप्रेमी यांचा यात सहभाग मोठ्या प्रमाणात होता. प्रियंका चौधरी म्हणाल्या, "वाढदिवस साजरा करताना तो समाजासाठी उपयुक्त ठरावा, हीच माझी भावना आहे. प्रत्येकाच्या हातात पुस्तक पोहोचवणे हे माझं ध्येय आहे." सध्या काळात वाचन संस्कृती लोप पावताना आपणाला दिसत आहे. त्या वाचन संस्कृतीला नवसंजीवनी देण्यासाठी माझ्या तर्फे हा मी खारीचा वाटा उचलला आहे. अशा "लायब्ररी गर्ल" प्रियंका चौधरी म्हणल्या. भविष्यकाळात हजारांचा आकडा हा लाखात नेहण्याचा त्यांचा मानस आहे.

## वाचनाची आवड निर्माण करणाऱ्या पुस्तकांमुळे मानवी जीवन समृद्ध

किशोर कदम यांचे प्रतिपादन; 'पुस्तकांवरील पुस्तकं' या विषयावर रंगल्या मनमोकळ्या गप्पा व 'द हाऊस ऑफ पेपर'चे प्रकाशन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"पुस्तके मानवी जीवन, अनुभवविश्व समृद्ध करतात. वाचनाची आवड निर्माण करणारे साहित्य खिळवून ठेवते. मानवी व समाज जीवनाचे विविध पैलू उलगडण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो. साहित्याचा वेध घेणारी पुस्तके आणि रसिकतेला दाद देणारी माणसे आपल्याभोवती आहेत, हे दिलासादायी आहे," असे प्रतिपादन कवी व अभिनेते किशोर (सौमित्र) कदम यांनी केले.



कृष्णा पब्लिकेशन्सच्या वतीने कार्लोस मारिया दोमिंगेज लिखित 'द हाऊस ऑफ पेपर' या अनुवादित पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात किशोर कदम बोलत होते. भांडारकर संशोधन संस्थेच्या सभागृहात आयोजित सोहळ्यात शरद पवार फेलोशिपचे समन्वयक व लेखक नितीन रिंढे, कवी व समीक्षक गणेश विसपुते, साहित्यिक प्रवीण बांदेकर, अनुवादक करुणा गोखले, यशवंतराव चव्हाण सेंटरचे मानद व्यवस्थापक दत्ता बाळसराफ, पुस्तकाचे अनुवादक अभिषेक धनगर, प्रकाशक चेतन कोळी, अनिल पवार आदी उपस्थित होते.

किशोर कदम म्हणाले, "चांगल्या पुस्तकांचा शोध घेणे, संग्रह करणे आणि त्याचे वाचन करणे आयुष्याला घडवीत असते. काव्य आपल्याला भावना व्यक्त करण्याचे व्यासपीठ देते. साहित्य हवेहवेसे आणि आनंददायी असावे. पुस्तकांच्या सानिध्यात राहिले, तरी आपल्या आयुष्यात ऊर्जा निर्माण होत राहते."

नितीन रिंढे म्हणाले, "पुस्तकांवर लिखाण करणे ही एक कला आहे. पुस्तके वाचली जातात की नाही, याची चिंता करण्यापेक्षा पुस्तकांच्या गर्दीत जगणे अतिशय सुंदर असते. पुस्तकांना केंद्रबिंदू मानून मराठीत पुस्तकांवरील पुस्तक येण्याची गरज आहे. पुस्तकांसोबतच पुस्तकांबद्दल मार्गदर्शन करणारा एक तरी मित्र आयुष्यात असावा."

गणेश विसपुते म्हणाले, "वास्तवाच्या जवळ जाणारी पुस्तके मनाला भिडतात. या पुस्तकात अनेक वास्तविक प्रसंग असून, आपल्याला अचंबित करतात. पुस्तकांचा संग्रह करण्याचे वेड असावे. जगभरातील अनेक चांगली पुस्तके शोधून त्याचा विविध भाषांत अनुवाद झाला, तर सर्व भाषिकांना समृद्ध साहित्य वाचण्याची संधी मिळेल."

प्रवीण बांदेकर यांनी साहित्याचा मानवी जीवनावर होणारा परिणाम विशद केला. वाचन माणसाला माणूस बनवते. जीवनाला एक नवी दिशा देते. विचार करायला शिकवते. त्यामुळे आपण सर्वांनी पुस्तकांशी मैत्री करा. वाचनामुळे मी घडलो, वाचनामुळेच माझ्यातील साहित्यिक निर्माण झाला व मला वेगळी ओळख मिळाली, असे त्यांनी सांगितले.

करुणा गोखले, दत्ता बाळसराफ, अभिषेक धनगर यांनीही मनोगत व्यक्त केले. चेतन कोळी यांनी प्रास्ताविक केले. मृदगंधा दीक्षित यांनी सूत्रसंचालन केले. अक्षय शिंपी यांनी पुस्तकातील निवडक उताऱ्यांचे अभिवाचन केले. आभार मृदगंधा दीक्षित यांनी केले.

## डि. बी. जे. महाविद्यालयाची विद्यार्थिनी दिव्या विजय गुरव वाणिज्य शाखेत प्रथम

**संगमेश्वर (दै. आरंभ पर्व)**

येथील नवकोकण एज्युकेशन सोसायटी संचलित डि. बी. जे. महाविद्यालयाची विद्यार्थीनी दिव्या गुरव वाणिज्य शाखेत तृतीय वर्षात सर्वप्रथम आली आहे. शेतकरी कुटुंबातून असलेल्या दिव्याने मेहनतीच्या जोरावर यश संपादन केल्याने तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

नवकोकण एज्युकेशन सोसायटी संचलित डि. बी. जे. महाविद्यालयाची यशस्वी परंपरा दरवर्षीप्रमाणे यंदाही कायम राहिली आहे. या महाविद्यालयाचा उत्तम शिक्षण देण्यासोबत गुणवंत विद्यार्थी घडविण्यावर जास्त भर असतो. त्यामुळेच या महाविद्यालयाचे नाव चिपळूण येथे शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्याने घेतले जाते. अशा या प्रतिष्ठित व नावाजलेल्या महाविद्यालयाचा अपेक्षेप्रमाणे निकाल लागला असून सर्व विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेले आहेत. यामध्ये वाणिज्य शाखेच्या तृतीय वर्षाच्या परीक्षेत दिव्या गुरव ही सर्वप्रथम आली आहे. दिव्याची घरची परिस्थिती जेमतेमच असून ती



एका गरीब शेतकरी कुटुंबातून आली आहे. वडील शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित असून त्यांना दोन्ही मुलीच आहेत. दिव्याची मोठी बहीण कंपनीत कामाला जाऊन वडिलांना हातभार लावण्याचा प्रयत्न करते. दोन्ही मुली हुशार असल्याने व वडिलांना कामात मदत करत असल्याने त्यांनी मुलाची उणीव भरून काढली आहे. दिव्या पहिल्यापासूनच अभ्यासात तरबेज असल्याने तिला परीक्षेत उत्तीर्ण होण्याची खात्री होती परंतु सर्वप्रथम आल्याचे कळताच तिचा आनंद द्विगुणित झाला आहे. तिच्या या यशामागे वडिलांचा आशिर्वाद आणि बहिणीची साथ ही देखील तितकीच मोलाची आहे.

## खांबावर चढलेला तरुण ग्रामस्थ व पोलिसांच्या मदतीने सुखरूप

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

कौटुंबीक समस्या व मानसिक त्रासामुळे आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात विद्युत खांबावर चढलेला तरुण स्थानिक ग्रामस्थ तसेच पोलिसांच्या मदतीने सुखरूप वाचला. ही घटना खेड एसईझेडमध्ये निमगावच्या हद्दीत घडली. या घटनेबाबत सविस्तर माहिती अशी की, निमगाव (ता.खेड) येथे खेड सिटी एसईझेडमध्ये एक २२ वर्षीय तरुण घरातील मानसिक ताणामुळे आत्महत्या करण्याच्या उद्देशाने दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास एका कंपनीच्या जवळील विद्युत वाहक खांबावर चढला. सुमारे दोन तास तो वर बसून होता. विद्युत प्रवाह सुरू होता. स्थानिक ग्रामस्थांच्या लक्षात हा प्रकार आल्यानंतर त्यांनी खांबावरील विद्युत प्रवाह तातडीने बंद केला व पोलिसांना माहीती दिली. या तरुणाला खाली येण्याची विनवणी पोलिस व नागरिक करत होते; मात्र तो खाली येत नव्हता. तुम्ही जर वर आले, तर मी उडी टाकीन, अशी धमकी तो वारंवार देत होता.

पोलिस हवालदार मोहन अवघडे यांच्यासह स्थानिक नागरिकांनी त्याचा जीव वाचवण्यासाठी वीजवाहक खांबाखाली संरक्षक जाळी धरुन ठेवली होती. त्याला समजाऊन सांगत असताना, दुसऱ्या बाजूने त्याला वाचविण्याच्या प्रयत्नात काही स्थानिक तरुण खांबावर चढले. परंतु त्यांची चाहुल लागताच त्या तरुणाने जीवन संपवण्याच्या उद्देशाने उडी मारली. खाली संरक्षक जाळी असल्याने उडी मारताना तो जाळीत पडल्यामुळे त्याचा जीव सुखरूप वाचला.

जैतुजीबाबा महाराज संजीवन समाधी सोहळा वर्धापन दिनानिमित्त

## भव्य रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिर धायरी येथे संपन्न

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

दिनांक 9/5 रोजी श्री धारेश्वर महादेव संस्थान, श्रीमंत धारेश्वर तरुण मंडळ, समस्त धायरी ग्रामस्थ यांच्या वतीने परम शिवभक्त जैतुजीबाबा महाराज रायकर समाधी स्थळ मारुती मंदिर धायरी सिंहगड रोड या ठिकाणी जाईतुजीबाबा महाराज संजीवन समाधी सोहळा वर्धापन दिन यानिमित्ताने भव्य रक्तदान शिबिर मोफत रक्त तपासणी, डोळे तपासणी,बीपी शुगर, दंत तपासणी व उपचार, मोफत हृदय तपासणी,ॲक्युप्रेशर थेरोपी आदी सर्व प्रकारच्या तपासण्या मोफत करण्यात आल्या .



सर्व नागरिकांसाठी भक्तांसाठी संध्याकाळी महाप्रसादाचे आयोजन मोठ्या प्रमाणात करण्यात आले होते.

याचा लाभ ग्रामस्थ व जेष्ठ नागरिक माता भगिनी यांनी मोठ्या प्रमाणामध्ये माता भगिनी घेतला जैतू जी बाबा महाराज यांच्यावर मोठ्या प्रमाणात श्रद्धा आहे . दरवर्षी त्यांच्या समाधी स्थळावर अशा प्रकारचे कार्यक्रम घेतले जातात सध्या युद्धजन्य परिस्थितीमध्ये या रक्तदान शिबिराला महत्त्व प्राप्त झाले होते. यामध्ये 105 रक्त पिशव्या संकलित करण्यात आल्या .पुणे रक्तपेढी यांच्या वतीने त्यांचा सर्व स्टाफ व डॉक्टर सर्वांनी अतिशय चांगले रीतीने हे रक्तदान शिबिर पार पडण्यास मोलाचे सहकार्य लाभले. देसाई हॉस्पिटल मंमदवाडी व सिल्वर बर्च हॉस्पिटल यांचे सहकार्य लाभले .

यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिलीप रायकर, तानाजी कांबळे याच प्रमाणे प्रमोद रायकर, सोमनाथ रायकर, शंकर रायकर, अनिल रायकर, देविदास रायकर सुनील रायकर,चंद्रकांत रायकर, लालचंद रायकर जयसिंग गव्हाणे व श्री धारेश्वर संस्थान श्री धारेश्वर तरुण मंडळ व धायरी ग्रामस्थ यांच्या सर्वांच्या सहकार्याने यशस्वी करण्यात आला .यावेळी प्रमाणात ग्रामस्थ,नागरिक, भक्त उपस्थित होते.

## जागतिक मातृदिनानिमित्त 'भारत की बेटी' पुरस्कार सोहळा

### 'भारत की बेटी' हा उपक्रम अनेकांना प्रेरणा देईल; सुमित जैन यांची भावना

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आई आपल्या जन्माचे मूळ असते. तिच्या वात्सल्य, संस्कारातून आपण घडतो. तिने दाखवलेल्या सन्मार्गावर चालत निर्भीडपणे व आत्मविश्वासाने यशोमार्गाकडे जायला हवे. आईच्या ऋणांतून आपण कधीही उतराई होऊ शकत नाही. त्यामुळे तिचे थोर उपकार कायम स्मरणात ठेवून समाजात स्त्रीसन्मान जपला पाहिजे," असे प्रतिपादन माईंड पॉवर ट्रेनर डॉ. दत्ता कोहिनकर यांनी केले.



जागतिक मातृदिनाचे (मदर्स डे) औचित्य साधून आयोजित 'भारत की बेटी' पुरस्कार सोहळ्यात डॉ. कोहिनकर बोलत होते. घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात मीडिया वर्ल्ड आणि साई बिसनेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन केले होते. प्रसिद्ध अभिनेता देव गिल, स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा अश्विनी कदम, कृषी अधिकारी श्रीकृष्ण सावंत, लेफ्टनंट कर्नल (नि.) समीर कुलकर्णी, शशिकांत धुमाळ गुरुजी, त्रिशरण एन्लायटन्मेंट फाउंडेशनच्या संस्थापिका श्रीमती प्रज्ञा वाघमारे, 'मीडिया वर्ल्ड'चे संचालक सुमित जैन, साई बिझनेस क्लबच्या डॉ. कृती वजीर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मनीषा पवार, मधुरा कानडे, सुवर्णा माने, आशना खोसला, मनीषा जगताप, सुनंदा पाटील, सारिका बांगर, अश्विनी पटेल, स्वप्नजा लोमटे, संगीता समुद्रे, अपेक्षा वायाळ, सायली ढोले, रुपाली इंगळे, अयोध्या टिळक, शीतल गोळे, डॉ. नीलिमा भारद्वाज, भाग्यश्री देशपांडे, रितू कैला, स्वाती माहेश्वरी, निशा काटे, निशा माने, निर्मला शेळके, मोनाली गुल्हाने, अंजली मानेकर, रूपा जाधव, सोनाली चौगुले, मनिषा रायरीकर, शुभांगी कांदे, डिंपल इंगळे, अंशू जोहरी, गीतसानिया कुलकर्णी, नेहा मराठे, प्राजक्ता जाधव, संगीता शिंदे, पूनम मांढरे, गौरी मोटे, यमुना शिवतारे, धनश्री साखरे, प्रियंका सूर्यवंशी, आरती महाले, कांचन कडू यांना 'भारत की बेटी २०२५' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सन्मानचिन्ह, मानपत्र, पदक आणि तिरंगा शाल असे पुरस्काराचे स्वरूप होते.

शशिकांत धुमाळ गुरुजी यांनी सर्व उपस्थितांना शुभाशीर्वाद दिले. अश्विनी कदम यांनी पुरस्कारार्थींचे अभिनंदन करीत यापेक्षा आणखी चांगले यश प्राप्त करण्याचा सल्ला दिला. देव गिल यांनी कोणतेही काम करताना सचोटी, जिद्द आणि अथक परिश्रम खूप गरजेचे असल्याचे नमूद केले. श्रीकृष्ण सावंत, समीर कुलकर्णी यांनीही मनोगते व्यक्त केली.

हा फक्त एक पुरस्कार सोहळा नसून भारत देशाला उज्ज्वल भविष्य देऊ पाहणाऱ्या प्रत्येक माता आणि भगिनींचा सन्मान आहे. जात-पात धर्म बाजूला ठेवून राष्ट्रप्रथम हा संस्कार रुजवण्याचे काम आईच करू शकते. 'भारत की बेटी' हा उपक्रम अनेकांना प्रेरणा देईल, अशी भावना सुमित जैन यांनी प्रास्ताविकात व्यक्त केली.



## थोडक्यात



### डोणजेमध्ये "ऑपरेशन सिंदुर" फटाके फोडत पेढे वाटून जल्लोष

खडकवासला (आरंभ पर्व) : पहलगाम दहशतवादी हल्याविरोधात भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या ऑपरेशन सिन्दुर अंतर्गत दहशतवाद्यांना चोख प्रतिउत्तर दिले. यानिमित्त सिंहगड भागामध्ये मोठा जल्लोष करण्यात आला. डोणजे येथे सिंहगडाच्या पायथ्याशी दिव्यांग विकास आघाडी व सर्वपक्षीय कार्यकर्त्यांच्या तर्फे फटाके फोडत पेढे वाटप करण्यात आले. दिव्यांग विकास आघाडीचे पुणे जिल्हाध्यक्ष बाजीराव पारगे यांनी ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले. भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. यावेळी दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाजीराव पारगे,बाळासाहेब पारगे, पंढरीनाथ चव्हाण, कुंडलिक चव्हाण, राजेश पारगे, राजू भामे,प्रकाश पायगुडे, बाळासाहेब वाल्हेकर, जोरकर,तेजस कोडीतकर, चव्हाण सर्वपक्षीय व समस्त डोणजे ग्रामस्थ यांनी जल्लोष केला.



### गोसासी येथे हॉटेल चालकावर गावठी पिस्तुलातून गोळीबार

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : गोसासी (ता. खेड ) येथे हॉटेल चालकावर एकाने गावठी पिस्तुलातून दोनदा गोळीबार केला. परंतु नेम चुकवला म्हणुन दुर्घटना टळली. मात्र टोळक्याकडून लाथा, बुक्क्यांनी मारहाण करत हॉटेल चालकाच्या भावाला बेदम मारहाण केली. 'हॉटेलचा चांगला धंदा होतोय, आम्हाला हप्ता चालु कर' असे म्हणत त्यांनी दहशत निर्माण केली. तसेच हॉटेल समोर असलेल्या दुचाकी गाड्या, चारचाकी मोटारींची तोडफोड केली. खेड तालुक्याच्या पुर्व भागात गोसासी येथे रविवारी (दि ११) मध्यरात्री झालेल्या याप्रकरणात खेड पोलिसांनी नऊ जणांविरोधात खंडणी, बेकायदा जमाव जमा करून दहशत, मारहाण तसेच बेकायदा शस्त्र बाळगुन जीवितास धोका पोहचविण्याच्या हेतुने गोळीबार असा गुन्हा दाखल केला असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे व पोलीस निरीक्षक प्रभाकर मोरे यांनी दिली. मयुर तानाजी हजारे, अक्षय बबन हजारे, मंगेश दौंडकर (तिघे रा. कन्हेरसर, ता. खेड), गणेश दिलीप गोरडे, (रा. गोसासी, ता. खेड), बंटी डफळ (रा.धामारी, ता. शिरूर) यांसह इतर चार अनोळखी युवकांचा त्यात समावेश आहे. हॉटेल चालक निलेश रोहिदास गोरडे यांनी खेड पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. याबाबत पोलिस निरीक्षक मोरे यांनी सांगितले की, शनिवारी (दि. १०) सबंधित हॉटेलमध्ये संशयीत आरोपींनी जेवण केले. बिलाचे पैसे मागितल्यावर अक्षय हजारे याने कमरेचा पट्टा काढून मालक निलेश याला मारण्याची धमकी दिली. हा वाद मिटल्यावर काही वेळाने म्हणजे हॉटेल बंद झाल्यावर रात्री बारा वाजण्याच्या सुमारास हे टोळके पुन्हा हॉटेल समोर आले. त्यांनी हॉटेल चालक आणि त्यांच्या भावांना शिवीगाळ केली. शिवीगाळ, दमदाटी करून त्यातील मयुर हजारे व अक्षय हजारे हे भाऊ संदेश याला 'तुझ्या हॉटेलचा धंदा चांगला होतो. तु आम्हाला हप्ता चालु कर. नाहीतर आम्ही तुम्हाला जिवंत सोडणार नाही.' असे म्हणुन खंडणीची मागणी केली. त्याला भाऊ संदेश गोरडे याने नकार दिला असता चिडुन जावुन मयुर हजारे याने त्याच्या हातातील पिस्तुल संदेश गोरडे यांच्यावर रोखुन त्यांना जिवे ठार मारण्यासाठी पिस्तुलमधुन दोन गोळ्या झाडल्या. परंतु संदेश याने गोळ्या चुकवल्या.

# मा. श्री. सचिन दोडके यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव






**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जनतेसाठी धडाडीने काम करणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेले पुणे महानगरपालिकेचे मा. नगरसेवक सचिन दोडके यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळपासून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव सुरूच होता.

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्ते व नेत्यांनी त्यांना सकाळपासूनच वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

हा वाढदिवस साधेपणाने मात्र हजारो कार्यकर्त्यांच्या उत्साहामध्ये हा साजरा करण्यात आला. सचिन भाऊ तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है!, जनतेच्या मनातील आमदार सचिनभाऊ दोडके अशा विविध घोषणांनी दोडके यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव केला.

सचिन दोडके यांनी मातोश्रींचे आशीर्वाद घेऊन आळंदी येथे माऊलींचे दर्शन घेऊन नित्यक्रमाची सुरुवात केली.मोदी बाग येथे खा. शरदचंद्र पवार साहेब यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.

यावेळी खासदार सुप्रियाताई सुळे यांनीही त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांच्या जनसंपर्क कार्यालयामध्ये सायंकाळी ७ वाजता उत्साहामध्ये हा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी "आमदार





### दोडकेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा !



**नेहमी बालकांनाही आपलेसे करणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेले सचिन भाऊ दोडके यांना बाल चमू नेही वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त निम्मित आदित्य गार्डन सिटी जवळील शांतिनिकेतन हॉलीबॉल मैदान येथे दोडके यांच्या वाढदिवसानिमित्त केक कापण्यात आला. यावेळी उपस्थित बालकांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांनी राबवलेल्या विविध उपक्रमाबद्दल त्यांचे आभार मानले. यावेळी दोडके यांनी सर्व बाल खेळाडूंशी हस्तांदोलन केले व खाऊ वाटप करण्यात आले. दोडके हे दरवर्षी लहान मुलांसाठी पतंग, आंबा खाण्याची स्पर्धा सारखे विविध उपक्रम घेत असतात. त्यामुळे लहान मुलांमध्ये ही त्यांच्याविषयी प्रेम आहे हे दिसून येते.**

### जनतेसाठी कटिबद्ध राहणार : दोडके

**वाढदिवसाच्या केवळ निमित्त आहे. मात्र सदैव जनतेसाठी कटिबद्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळामध्ये खडकवासला मतदारसंघातील प्रश्नासाठी खा. सुप्रियाताई सुळे यांच्या सोबत मी ही रस्ते,वाहतूक समस्या, समाविष्ट गावासाठी पाणीपुरवठा , शहरी भागातील विविध समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. जनतेला आश्वासक असे काम करण्यासाठी मी ही निश्चितपणे तत्पर असणार आहे. आपण सर्वांनी दिलेल्या शुभेच्छा बद्दल मी मनःपूर्वक आभारी आहे.. अशी भावना दोडके यांनी बोलून दाखवली.**

### जनतेचे मनातील आमदार म्हणून कार्यकर्त्यांची घोषणाबाजी!

**यावेळी खडकवासला मतदारसंघातील उपस्थित अनेक कार्यकर्त्यांनी जनतेचे मनातील आमदार म्हणून जोरदार घोषणाबाजी केली. उत्साही कार्यकर्त्यांनी जनतेचे आमदार नावाचा मोठा केक कापण्यात आला. विधानसभेच्या अनपेक्षित निकालानंतरही सचिन दोडके यांच्यावर कार्यकर्त्यांचे असलेले अपार प्रेम या निमित्त दिसून आले.**

सचिन भाऊ दोडके, आदर्श वारजे काळेवाडी, विविध प्रकारचे केक कापून कार्यकर्त्यांनी दोडके यांच्यावर असलेले प्रेम दाखवून दिले.

खडकवासला मतदारसंघ सह पुणे शहरातील विविध कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी दोडके यांची भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या..

यावेळी संजय ( बाबू) दोडके, वीरेश भाऊ शितोळे, त्यांच्या सचिन दोडके मित्रपरिवार व मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



### “प. पू. माई अभ्यंकर पुरस्कार” सौ. पल्लवी सुरसे यांना प्रदान

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

जय शंकर प्रतिष्ठान पुणे आयोजित योगीराज सद्गुरु श्री शंकर महाराज भक्त स्नेहमेळाव्यात कै. सौ. माई पुराणिक यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा “प. पू. माई अभ्यंकर पुरस्कार” ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या आणि स्वाभिमानी महिला संघटनेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. पल्लवी प्रशांत सुरसे यांना प्रदान करण्यात आला.

सुमारे सात राज्यांमधून आणि चार देशांमधून हजारो भक्तांच्या उपस्थितीत हा स्नेहमेळावा पार पडला. प्रारंभी प. पू. पप्पाजी पुराणिक महाराज, खोपडे बापू व बालकिसन राठी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व ध्वजारोहण झाले. यानंतर श्री दत्तयाग, सामूहिक गीता पारायण, व विदेशी भक्तांसाठी इंग्रजी भाषांतरित ग्रंथ प्रकाशन यांसारखे कार्यक्रम झाले.

### मसाज पार्लरच्या नावाखाली चाललेला वेश्याव्यवसाय बंद करा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्ह्यात अनेक ठिकाणी मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालू असुन हा व्यवसाय बंद करण्याची मागणी अखिल भारतीय छावा युवा संघटनेने पुणे पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांना निवेदनाद्वारे केलीआहे . आखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने पुणे पोलिस आयुक्त अमिताभ गुप्ता यांना मसाज पार्लरच्या नावाखाली होणारा वेश्याव्यवसाय तत्काळ बंद करण्यात यावा अन्यथा मुंबई मंत्रालय येथे आमरण उपोषण करण्यात येईल असे निवेदनात म्हटले आहे . पुणे शहर ,जिल्ह्यात मसाज पार्लरच्या नावाखाली बरेच ठिकाणी लायसन नसताना देखील मसाज कसा करायचा हे माहिती नसताना देखील मसाज करण्यासाठी १२०० ते २००० हजार रुपये घेतले जातात .रूममध्ये गेल्यानंतर पैशासाठी गरजू महिला यांच्याकडून पुरुषांना बंद खोलीत गेल्यानंतर कपडे काढल्यानंतर अशील चाळे करून पुरुषांना उत्तेजित करण्यास भाग पाडतात. त्यामुळे मशाज च्या नावाखाली पुरुषांची लूट चालू असून हा सर्व प्रकार पोलीस स्टेशनला माहिती असताना देखील पोलीस त्याकडे दुर्लक्ष करतात हा व्यवसाय बंद करावा नाहीतर अखिल भारतीय छावा युवा संघटनेच्या वतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालय समोर , मुंबई येथे आझाद मैदानात आमरण उपोषण करण्यात येईल असे निवेदनात म्हटले आहे यावेळी आखिल भारतीय छावा संघटना पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष मच्छिंद्र भाऊ चिंचोळे, पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सचिन आण्णा लिमकर, पुणे जिल्हा अध्यक्ष अक्षय भाऊ बोडके, पुणे जिल्हा अध्यक्ष अल्पसंख्याक सर्फराज भाई शेख, पुणे जिल्हा उपाध्यक्ष माणिक भाऊ गरड, पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष सोशल मीडिया शुभम बिरादार, पिंपरी चिंचवड उपाध्यक्ष कुनाल जाधव,विष्णु पवार व आदि कार्येकर्ते उपस्थित होते.



# सारोळे ग्रामपंचायत सरपंचपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी जाहीर

- **कर्तृत्व आणि नेतृत्व आणि जनाधार दमदार असणाऱ्या नेत्यांना मोठी संधी**
- **तिसऱ्या पर्यायी मार्गाचा अवलंब झाल्यास मोठी रंगत निर्माण होणार!!**

**सोलापूर (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाच्या आरक्षण सोडती नुकत्याच जाहीर करण्यात आल्या.

आगामी कार्यकाळ संपणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये तालुक्यातील चर्चेमध्ये असणाऱ्या सारोळे ग्रामपंचायतचे आरक्षण ही जाहीर झाले आहे.

यामध्ये सर्व साधारण गटासाठी सरपंच पद आरक्षित झाले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीमध्ये सरपंच पदासाठी मोठी चुरस निर्माण होणार आहे.

संवेदनशिल समजल्या जाणाऱ्या सारोळे ग्रामपंचायतीच्या निवडणुक ही नेहमी प्रतिष्ठेची समजली जाते.

ही निवडणूक नोवेंबर डिसेंबर मध्ये होण्याची शक्यता असल्याने निवडणुकीच्या रणनीतीला पडद्यामागून सुरुवात झाली आहे.

सारोळे ग्रामपंचायतची निवडणूक आजपर्यंत एकता पॅनेल व नरसिंह पॅनल अशी दुरंगी व प्रमुख दोन्ही गटांमध्ये झाली आहे.

व सातत्याने आलटून पालटून सत्ता दोन्ही गटाला मिळाली आहे.

यावर्षी आरक्षणकोणते निघणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असता पुन्हा सर्व साधारण गटाला आरक्षण जाहीर झाल्यामुळे मोठी चुरस निर्माण होणार आहे.




येथील मतदार हे सुज्ञ असल्याचे आजपर्यंतच्या निकालावरून दिसून येते.

लोकसभा निवडणुकीमध्ये खा. ओमराजे निंबाळकर यांच्या पाठीशी राहणारे गाव विधानसभेला माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या पाठीशी राहिले आहे.

यामुळे आगामी काळात गावकरी सरपंच निवडून देताना दमदार कर्तुत्व नेतृत्व बरोबरच व्यक्ती पाहूनही तसेच नवखा उमेदवारालाही मतदान करण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

सरपंचाची निवड जनतेतून होणार असल्यामुळे गावातील जनाधार ज्याच्या ज्याच्या पाठीशी राहील तो यंदा सरपंच होणार आहे त्यामुळे केवळ आपापले वार्ड न पाहता संपूर्ण गावकऱ्यांना उपलब्ध असणारा व काम करणारा नेता सरपंच होणार.

यावर्षी दोन्ही गटाबरोबरच तिसऱ्या आघाडीचा पर्यायी उमेदवार उभा राहिल्यास मोठी रंगत निर्माण होण्याची शक्यता ही आहे.

मात्र निवडणुकीचे बिगुल वाजल्याशिवाय काही सत्य उलघडणार नाही. गेली दहा वर्षापासून एकता ग्राम विकास आघाडीची सत्ता आहे. अडीच वर्षाचे सरपंच सोडता नरसिंह पॅनलला यश मिळाले नाही.

मा.आ. राजाभाऊ राऊत यांच्या माध्यमातून केलीली 3कोटी रुपयांची विकासकामे ही सत्ताधाऱ्यांची मोठी कामगिरी आहे.

तर दहा वर्षापासून रंगलेले विविध प्रश्न सोडवण्याचे आश्वासन देत, सत्ता असताना केलेली विकास कामे, तंटामुक्त गाव , प्रतिसाद ह्यामुळे विरोधी गटाला सत्तेचा विश्वास आहे.

गावामध्ये बदल करणारा नेता सरपंच व्हायला हवा,सर्व समावेशक जनसंपर्क असणाऱ्या नेत्याला संधी द्यावी अशी येथील युवकांची मागणी आहे. सत्ताधारी गटाला अंतर्गत नाराजीचा मुद्दा, नरेटिव्ह ह्या समस्या आहेत मात्र त्यांचे तिन्ही प्रभागात चांगले नियंत्रण आहे.

गावची निवडणूक इतिहास पाहता निवडणूक निकाल लागल्याशिवाय थांगपत्ते लागत नाही असा इथला नियम आहे.

प्रतिस्पर्धी उमेदवार कोण यावरही या निवडणुकीचे गणित अवलंबून असणार आहेत.

ही निवडणूक एकता ग्राम विकास आघाडी, नरसिंह ग्राम विकास आघाडी तसेच तिसरा किंवा अन्य चौथा उमेदवार अशी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

त्यामुळे ही निवडणूक सर्वात लक्षवेधी असणार आहे.

गावातील संवेदनशील वातावरण पाहता निवडणूक लागल्यानंतर प्रचार यंत्रणा आणि वातावरण पाहता ही निवडणूक रंगतदार होणार आहे.

मात्र निवडणुकीच्या रिंगणातील सुरुवात आतापासून झाल्याचे संकेत मिळत आहेत..

येथे 40%मतदान हे युवा वर्गाचे आहे. तर 20% टक्के मतदान हे मागासवर्गीय समाजाचे आहे.

यावरही मतदानाची बरीच गणित अवलंबून आहेत.

आज पर्यंत कोणीही न केलेली कोटी रुपयांचीगावातील विकासकामे याही पुढे करण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न आहे. तर सत्ताधाऱ्यांनी जे कामे केली नाही ते आम्ही पाच वर्षात पूर्ण करण्याचा संकल्प नरसिंह आघाडीने केला आहे.

या व्यतिरिक्त तिसरा पर्याय किंवा चौथा पर्याय आणखी कोणती भूमिका मांडतो हे आगामी काळात कळणार आहे.

दोन्ही गटांच्या व्यतिरिक्त नवखा वेगळ्या विचारांनी उमेदवार, आघाडीने निवडणूक लढवण्याचा विचार केल्यास ही निवडणूक अत्यंत रंगतदार होणार आहे..निवडणुकीमध्ये काहीच अशक्य नसते. त्यामुळे सर्व काही हे पत्ते निवडणूक लागल्यानंतर कळणार आहेत.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.